झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
Email : info@sra.gov.in

जा.क्र. झोपुप्रा/उजि/दक्षता पथक/२०११/ १६५५

परिपत्रक क्रमांक :- १२५

19 MAY 2011

विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत होणा-या सदनिकेच्या हस्तांतरणाबाबत पुनर्वसन सदनिकेतुन अनधिकृत व्यक्तीचे निष्कासन करुन सदनिका प्राधिकरणाच्या ताब्यात घेण्याबाबत दक्षता पथक निर्माण करणेबाबत.

संदर्भ :- १. जनहित याचिका क्र. ११९/२००९ व १४३/२००९

२. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालयाकडील पत्र क्र. याचिका-२०१०/प्र.क्र.४४/झोपनि-२, दि. २८/०९/२०१०.

उपरोक्त विषयी मा. मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, मुंबई येथे क्र. ११९/२००९ व १४३/२००९ अन्वये पुनर्वसन योजनांअंतर्गत विक्री केलेल्या पुनर्वसित सदनिकांचे निष्कासन करणेबाबतची जनहित याचिका दाखल करण्यात आलेली होती. याचिकेच्या अनुषंगाने शासनाकडून संदर्भ क्र. २ अन्वये पत्र प्राप्त झालेले होते. सदर पत्रानुसर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील सदनिका वाटपाच्या आदेशात सदर सदनिका १० वर्ष हस्तांतरीत करण्यास निर्बंध असल्याचे स्पष्टपणे उल्लेख करणारे आदेश वजा परिपत्रक निर्गमित करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र झोपडपट्टी [सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास], अधिनियम १९७१ मधील कलम ३ई व विकास नियंत्रक नियमावली कलम ३३[१०] मधील परिशिष्ट-२ मधील १.१८ च्या तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये लाभ मिळालेल्या पुनर्वसन सदनिका ताब्या मिळाल्यापासून १० वर्षापर्यंत सदर सदनिका हस्तांतरीत/भाडेतत्वावर/विक्री करता येत नाही. तथापी असे असतानासुध्दा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत सदनिकांचे अनधिकृत हस्तांतरण होत असल्याचे निदर्शनास आल्याने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत होणा-या सदनिकेच्या हस्तांतरणबाबत पुनर्वसन सदनिकेतुन अनधिकृत व्यक्तीचे निष्कासंन करुन सदनिका झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या ताब्यात घेण्याच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या अधिपत्याखाली खालील प्रमाणे दक्षता पथक निर्माण करण्यात येत आहे.

१. दक्षता पथक प्रमुख- उपजिल्हाधिकारी.

२. सदस्य सचिव- उपनिबंधक. [उपनगर जिल्हयांसाठी]

३. सदस्य-सहाय्यक निबंधक [मुंबई शहर जिल्हयासाठी]

४. सदस्य- तहसिलदार.

५. सदस्य- योजनेशी संबंधित सहाय्यक अभियंता.

६. सदस्य- सहाय्यक वनसंरक्षक [संरक्षण]

७. सदस्य- वनक्षेत्रपाल [संरक्षण]

वरील दक्षता पथकाने प्राप्त तक्रारीनुसार त्यांचे अधिनस्त अधिकारी/कर्मचारी/उपसमाज विकास अधिकारी यांचे मार्फत पहाणी करुन अनधिकृत हस्तांतरण झालेल्या सदनिकांच्या अनुषंगाने निष्कासनाचे आदेश पारित करावेत व सदर आदेशानुसार प्रत्यक्ष निष्कासनाची कार्यवाही संबंधित विभागाच्या सक्षम प्राधिका-यांनी करुन रिकामी झालेली सदनिका झोपडपट्टी पुनर्वसन प्रधिकरणाकडील संबधित विभागाच्या कार्यकारी अभियंता यांचे ताब्यात देऊन तसा अहवाल पथक प्रमुखास सादर करावा.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**